**पश्चिम घाट (कास पठार) :** हिमालयापेक्षाही प्राचीन अशा पर्वत रांगा म्हणजे पश्चिम घाटाचा परिसर आहे. जगातील सर्वाधिक जैवविविधता असणाऱ्या आठ प्रदेशांपैकी एक असा हा भाग आहे. २०१२ मध्ये या घाटाची जागतिक वारसा यादीत नोंद झाली असून, साताऱ्याजवळील कास पुष्प पठाराचाही यामध्ये समावेश आहे.



करून पाहा

# फडफडणारे फुलपाखरू



**साहित्य**

**दोरा, ग्लू, बीट्स, पुठ्ठा, कागद**

**कृती**

**प्रथम पारदर्शक कागदावर फुलपाखरू काढून ते मार्करने रंगवून कापून घ्या.**



**१) त्यानंतर ए४ आकाराच्या प्लेन पुठ्यावर पांढरा कागद चिकटवा. त्याच्या मध्यभागी सरळ रेषेत थोडासा डिंक किंवा फेव्हिकॉल लावून तुम्ही काढलेले फुलपाखरू चिकटवा. फुलपाखराच्या मध्यभागी फक्त डिंक लागेल याची काळजी घ्या.**



**२) फुलपाखरू चिकटविल्यानंतर वरच्या बाजूला मध्यभागी थोडासा डिंक लावून एक बीट्स चिकटवा.**



**३) या बीट्सला दोन्ही बाजूला छिद्रातून दोरा ओवून त्याचे एक-एक टोक फुलपाखराच्या पंखांमध्ये चित्रात दाखविल्याप्रमाणे गाठ मारून सोडा.**



**४) फुलपाखराच्या मध्यातून आलेल्या दोरीच्या शेवटच्या टोकाला हिरव्या रंगाचे एक बीट्स लावा.**



**५) त्यानंतर हे फुलपाखरू नोटीस बोर्ड, थर्माकोलच्या शीटवर टाचण पिनने लावा. हिरव्या रंगाच्या बीट्स ओढल्यानंतर ते खऱ्या फुलपाखराप्रमाणे फडफडू लागेल.**

**- विवेक आनंद, आयुका विज्ञान केंद्र**